सामना उत्सव रविवार पुरवणी
गुरुजी
शोध
आपली प्रतिक्रिया कळवा

# नादसामर्थ्य आणि अध्यात्म

नाम किंवा मंत्रांची सर्वसाधारणपणे तीन प्रकारात विभागणी करता येईल. नादप्रधान, अर्थप्रधान आणि शब्दप्रधान, नाम/मंत्र. मूलत: कुठलेही नाम, मंत्र किंवा अक्षर हे काहीतरी नाद निर्माण करते. नादात मोठे सामर्थ्य असते. विश्वाची निर्मितीदेखील नादातून झाली असे आधुनिक विज्ञानाने 'बिग बॅग' सिद्धांतानुसार मान्य केले आहे.

प्राचीन काळापासून अर्वाचीन काळापर्यंत पृथ्वीवर निर्माण झालेल्या सर्व सजीवांमध्ये मानवाचा मेंदू हा त्याच्या वजनाच्या प्रमाणात सर्वाधिक असल्यामुळे मानव सर्वाधिक बुद्धिमान आहे असं आधुनिक विज्ञान सांगतं. या बुद्धिमान मानवाच्या प्रगतीचा आढावा जर आपण घेतला तर आपल्या असं लक्षात येईल की, या प्रगतीमध्ये 'शब्दसामर्थ्य', 'अक्षरसामर्थ्य' यांचा सहभाग फार मोठा आहे. इतर प्राण्यांच्या तुलनेत मानव आपले विचार शब्दांच्या माध्यमातून उत्तम तऱ्हेने दुसऱ्यापर्यंत पोहोचवू शकतो. काही विशिष्ट मर्यादेपर्यंत पशु-पक्षी-कीटकसुद्धा एकमेकांत संवाद साधू शकतात; परंतु वर्णाक्षरांनी समृद्ध असलेली मानवी भाषा सर्वाधिक प्रगल्भ मानली जाते. शब्दांच्या माध्यमाचा विकासही मनुष्याच्या प्रगतीनुसार होत गेला. भाषा विकसनाचे हे कार्य आजही सुरू आहे. आजच्या आधुनिक युगात मानव आणि संगणक यांच्यात संवाद साधू शकणाऱ्या म्हणजे निर्जीवाला सजीवाशी जोडणाऱ्या भाषांचे तंत्रज्ञान झपाट्याने विकसित होत आहे. भाषेचे सर्वात प्रगत कौशल्य म्हणजे मोठा आशय कमीत कमी शब्दात व्यक्त करणे. आधुनिक विज्ञानात अनेक प्रमेय किंवा सूत्रं आहेत ज्यात मोठा आशय सामावलेला असतो, उदा. : $E=MC^2$ किंवा $(a+b)^2 = a^2+2ab+b^2$ इ. प्राचीन हिंदुस्थानी संस्कृतीमध्ये देखील सखोल आध्यात्मिक आशय असलेली पातंजल योगसूत्रे, ब्रह्मसूत्रे, धर्मसूत्रे, नारदीय भक्तिसूत्रे यांसारखे सूत्रबद्ध लिखाण मोठ्या प्रमाणात झालेले आढळते. किंबहुना अध्यात्मातले प्रत्येक नाम किंवा मंत्र हे सूत्ररूपाने असतात, ज्यामध्ये विशिष्ट हेतू, विशिष्ट विचार आणि त्यातील शब्दार्थापेक्षाही अधिक आशयघन अर्थ सामावलेला असतो.

हा नाद तीन प्रकारच्या लहरींद्वारे निर्माण होत असतो. या लहरी लघु, मध्यम आणि दीर्घ स्वरूपाच्या असून सर्व विश्वात सामावलेल्या असतात. प्रत्येक सजीवालाही स्वत:चा असा विशिष्ट नाद अथवा स्पंदन असते. नादलहरींचे वैशिष्ट्य म्हणजे या नादलहरी शक्तीची निर्मिती, शक्तीचे वहन आणि शक्तीचे प्रोक्षण करण्यास समर्थ असतात. अर्थात यासाठी नादप्रधान मंत्र किंवा नादप्रधान नाम विशिष्ट लयीत, विशिष्ट नादात, उच्चरवात आणि वैखरीवाणीत करणे आवश्यक असते. वैदिक ऋचा, सूक्त किंवा मंत्राचे पठण एका विशिष्ट लयीत व तालात केले जाते, याचे कारणही हेच आहे की हे सर्व शब्द समुच्चय नादप्रधान आहेत. काही मंत्र किंवा नाम अर्थप्रधान असतात. उदाहरणार्थ 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' हे नाम. त्यातला आशय, अर्थ हा सर्वात महत्त्वाचा असून अर्थबोधासह त्याचा जप केला तरच उचित परिणाम साध्य होतो. नामाचा अर्थपूर्ण आशय लक्षात आला की त्यातला हेतू लक्षात येतो आणि हेतूचे निश्चित आकलन झाले की अपेक्षित परिणाम साध्य करणे सुलभ होते. काही मंत्र किंवा नाम शब्दप्रधान प्रकारातले असतात. याचे उत्तम उदाहरण म्हणजे शेगावचे सिद्धपुरुष श्रीगजानन महाराज यांनी त्यांच्या शिष्यांना दिलेले नाम, 'गण गण गणात बोते', या नामातला निश्चित शब्दार्थ सांगता येत नाही. नाथपंथीयांचे कित्येक शाबरी मंत्रसुद्धा असेच शब्दप्रधान असतात. तरीही हे नाम किंवा मंत्र बलवान आहेत, शक्तिमान आहेत, कारण कोणीतरी सत्पुरुषाने त्यांना सिद्ध केले आहे. त्यात प्रचंड शक्ती प्रोक्षित केली आहे. त्या सिद्ध पुरुषांद्वारे हा मंत्र ज्याला दिला जातो त्याने श्रद्धापूर्वक अंत:करणाने, शंकाविरहित अवस्थेत सद्हेतूपूर्वक शब्दोच्चारण करणे सर्वात महत्त्वाचे असते. मग एकवेळ त्याचा अर्थबोध पूर्णांशाने नाही झाला तरी चालेल, परंतु ते नाम देणाऱ्यावर पूर्ण श्रद्धा मात्र अनिवार्य असते! उच्चारलेल्या शब्दांच्या परिणामांना अपेक्षित दिशा देण्यासाठी कारणीभूत ठरतो. सर्व भौतिक, पारलौकिक इच्छा मनावर अवलंबून असतात. शरीर हे इच्छापूर्तीचे साधनमात्र असते. आध्यात्मिक प्रगती साध्य करण्यासाठी मनाची जी निश्चल, दृढ अवस्था निर्माण व्हावी लागते ती निर्माण होण्यासाठी शक्ती पुरवण्याचे काम नाम-मंत्ररूपी शब्दच करू शकतात. कारण शब्दांचे माध्यम अत्यंत प्रभावी आहे. शब्द आकार निर्माण करतात, शक्ती निर्माण करतात आणि अनुकूल विचारांसह कृतीही घडवून आणतात. शब्दांचे महाप्रचंड सामर्थ्य लक्षात घेऊन त्यातले ज्ञान समजावून घेऊन त्या सामर्थ्याचा उपयोग, नामजप किंवा मंत्रपठणाद्वारे आध्यात्मिक उन्नतीसाठी प्रत्येकाने करून घ्यायला हवा.

- बापट गुरुजी



Ads by Guruji


SMART
Presenting the
New Ford FIGO
Ford
Feel the difference


SMART
Presenting the
New Ford FIGO
SMARTER
Test drive today
Ford
Feel the difference